# श्री गुरू गोबिदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था,

## विष्णुपूरी, नांदेड ४३१ ६०६.

## (महाराष्ट्र शासन अनुदानित स्वायत संस्था)

**दुरघ्वनी क्र.** ०२४६२-२२९२३४, **फॅक्स न.** २२९२३६, **वेब साईट** www.sggs.ac.in **ईमेल.** director@sggs.ac.in

संस्थेच्या नविन शैक्षणिक वर्षाच्या कार्यक्रमाची सुरुवात Wel-come program घेवून नामवंत व्यक्तींचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्याकरीता गांधीवादी विचारसरणीचे तज्ञ विचारवंत श्री अविनाशजी धर्माधिकारी, माजी-भारतीय प्रशासकीय सेवा (आय.ए.एस.) आणि अध्यक्ष, चाणक्य ट्रस्ट तसेच डॉ.अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे व्याख्यान आयोजित केले होते, कांही कारणास्तव डॉ.वाघ हे उपस्थित राहु न शकल्याबद्दल त्यांनी सदरील कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ.आर.एस.होळंबे, अधिष्ठाता (शैक्षणिक) यांच्या मार्गदर्शनाने झाली, त्यात त्यांनी चालु शैक्षणिक वर्षातील मुल्यांकन पध्दती कशी असेल याची सर्व विदयार्थ्यांना माहीती दिली.

संस्थेचे संचालक डॉ.यशवंत जोशी यांनी आपल्या भाषणात संदेश देतांना सांगितले की कोरोना महामारीच्या काळात आपले आयुष्य संवेदनशिल झालेले आहे, लॉकडाउन झाल्यापासून संस्था ऑन-लाईन शिक्षण मुलांना सहजतेने उपलब्ध व्हावे व त्यांना कोणताही त्रास होउ नये, यासाठी प्रयत्न चालू ठेवले होते, त्याचाच एक भाग म्हणून संस्थेने COURSERA आणि EDeX सारखे नामवंत अंतरराष्ट्रीय शैक्षणिक व्यासपीठ संस्थेमार्फत मोफत उपलब्ध करुन दिले. एकूण ३००० विदयार्थ्यांपैकी २१०० विदयार्थ्यांनी लॉकडाउन काळात coursera कोर्सेसकरीता रजिस्ट्रेशन केले व १७०० पेक्षा जास्त विदयार्थ्यांनी १ किंवा २ विषयात कोर्स पूर्ण केला.



भारतीय शिक्षण प्रणालीचे स्वयंम, NPTEL या व्यासपीठावर देखिल विदर्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन संस्थेने Credit Transfer Scheme उपलब्ध करुन दिली आहे. संस्थेत उपलब्ध असलेल्या moodle चे व्यासपीठ शिकविण्यासाठी वापर करण्याची माहिती आपल्या भाषणात संचालक डॉ.जोशी यांनी दिली.

मा.अविनाश धर्माधिकारी यांनी विदर्यार्थ्यांना मार्गदशर्न करतांना असे सांगितले की आपण कोरोनाचा काळ संपण्याची वाट पाहात आहोत, कोरोना काळ जरी संपला तरी आपले आयुष्य सामान्य स्थितीत येण्यापेक्षा आयुष्य नविन सामान्य (New normal) स्थिती निर्माण होईल.

विदयार्थ्यांनी COURSERA वरती मोठया संख्येने केलेले कोर्सेस तसेच MPSC व UPSC मध्ये संपादन केलेले घवघवित यश यासाठी त्यांनी संस्थेचे संचालक डॉ.जोशी यांचे अभिनंदन केले.

भारतीय संशोधकांनी संसाधन उपलब्ध नसतांना देखिल संशोधनाच्या जागतिक स्तरावर आपला ठसा उमटविलेला आहे याची विदयार्थांना जाणीव करुन देतांना त्यांनी श्री शिवराम तळपदे यांनी लावलेला विमानाचा शोध तसेच श्री नारायणमुर्ती यांनी उभारलेली Infosys company याबद्दल विदर्यार्थ्यांना सुरेख अशी प्रगतीची गोष्ट सांगितली. स्वतःवरील विश्वास नसणे हा एकमेव अडथळा आपल्या प्रगतीचा महत्वाचा अडथळा आहे, त्यामुळे स्वतःवरील विश्वास ठेवा. सृजनशिलता (Creativity) आणि उत्क्रष्टता (Excellence) हे दोन्हीही सोबत एकत्र चालत असतात. कोरोना महामारीमुळे साधारणतः ६५ टक्के नोकरीचे स्वरुपात बदललेले असेल, तर आपणास अशा ६५ टक्के नविन नौक-यासाठी तयार राहावे लागेल. त्याकरीता भारतीय जीवन पध्दती अस्तित्वात असलेली स्वाध्याय कौशल्य व योग्य जीवन पध्दती हीच या संकटावर मात करील, असे प्रतिपादन मा.धर्माधिकारी यांनी केले.

कार्यक्रमाचे संचलन अतिशय उत्क्रष्टपणे प्रा.मिलींद भालेराव यांनी आपल्या खास शैलीत केले.

संस्थेच्या आय.टी.सेलचे अधिष्ठाता डॉ.गणेश पाकले यांनी सदरील कार्यक्रम गुगल-मीट आणि यु-टयुब चा कोशल्यपुर्ण वापर करुन कुठलाही अडथळा न येवू देता पार पाडला.

कार्यक्रमाचे आयोजक डॉ.अरुण पाटील, अधिष्ठाता, विदयार्थी विभाग यांनी सर्वांचे आभार व धन्यवाद मानले.